**महाराष्ट्र शासन**

**इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य मुंबई**

**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी), महाराष्ट्र राज्य, नागपूर**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर – 440 022**

**Website : www.vanarti.in CIN : U84120MH2026NPL466492 Email : vanarti.info@gmail.com**


जा.क्र. वनार्टी/नागपूर/आस्था/ 834/2026-27 दि. 26/08/2026

# -: परिपत्रक :-

**वनार्टी मार्फत "महाराष्ट्र राज्यसेवा मुख्य परीक्षा – 2025" उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मुलाखत चाचणी परीक्षेकरिता अर्थसहाय्य योजनेचा तपशील**

महाराष्ट्र राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील जे विद्यार्थी **"महाराष्ट्र राज्यसेवा मुख्य परीक्षा - 2025"** (दि. 25/08/2026 रोजी MPSC ने जाहीर केलेल्या निकालाप्रमाणे) उत्तीर्ण झालेले आहेत अशा विद्यार्थ्यांना मुलाखत चाचणी परीक्षेकरिता एकरकमी अर्थसहाय्य प्रदान करण्यासाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

**योजनेच्या लाभासाठी पात्रता :**

1. विद्यार्थी महाराष्ट्रातील रहिवासी असावा/असावी.
2. विद्यार्थी हा नॉन- क्रिमिलेअर गटातील विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील असावा/असावी.
3. विद्यार्थी हा **"महाराष्ट्र राज्यसेवा मुख्य परीक्षा – 2025"** (दि. 25/08/2026 रोजी MPSC ने जाहीर केलेल्या निकालाप्रमाणे) उत्तीर्ण झालेला असावा/असावी.
4. ज्या विद्यार्थ्यांना सदर परीक्षेकरिता महाज्योती संस्थेमार्फत अर्थसहाय्य मिळत असल्यास अश्या विद्यार्थ्यांना सदर योजनेच्या लाभासाठी ग्राह्य धरल्या जाणार नाही.

**अर्ज करण्यासाठी आवश्यक वैयक्तिक कागदपत्रे :**

1. आधार कार्ड (पुढील व मागील बाजुसहित)
2. जातीचा प्रमाणपत्र (Caste Certificate)
3. वैध नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र (Non-Creamy Layer Certificate)
4. **महाराष्ट्र लोकसेवा आयोग राज्यसेवा मुख्य परीक्षा**–2025 चे प्रवेशपत्र.
5. **महाराष्ट्र लोकसेवा आयोग राज्यसेवा मुख्य परीक्षा**–2025 उत्तीर्ण झाल्याच्या निकालाची प्रत. निकालाच्या प्रतीमध्ये अर्जदाराचा **बैठक क्रमांक स्पष्टपणे अधोरेखित/ठळक केलेला असावा.**

**अर्ज कसा करावा .**

1. वनार्टी www.vanartri.in या संकेतस्थळावर जाऊन Notice Board मधील **“Application Invited For Financial Assistance to Those Who Have Qualified For MPSC Interview – 2025” (MPSC State Services Examination)** यावर जाऊन ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावा.
2. अर्जासोबत वरील नमूद कागदपत्रे स्वाक्षांकीत करुन स्पष्ट दिसतील असे स्कॅन करुन अपलोड करावे.

**अटी व शर्ती :**

1. अर्ज करण्याची अंतिम दि. 10/09/2026 आहे.
2. पोस्टाने किंवा ई-मेल द्वारे प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.
3. सदर जाहिरात रद्द करणे, अर्ज सादर करण्याच्या मुदतीत वाढ करणे तसेच प्राप्त अर्ज स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे सर्व अधिकार **व्यवस्थापकीय संचालक, वनार्टी** यांचेकडे राहतील.
4. अर्जदाराने सादर केलेली माहिती किंवा कागदपत्रे अर्जाच्या छाननीदरम्यान अथवा अंतिम निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर चुकीची, अपूर्ण, दोषपूर्ण अथवा दिशाभूल करणारी असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित उमेदवाराचा अर्ज/लाभ रद्द करण्यात येईल. तसेच, आवश्यकतेनुसार संबंधित उमेदवार कायदेशीर कारवाईस पात्र राहील.
5. वनार्टी मार्फत राबविण्यात येणाऱ्या अर्थसहाय्य योजनेअंतर्गत चालु आर्थिक वर्षात विद्यार्थी कोणत्याही एकाच अर्थसहाय्य योजनेचा लाभ घेण्यास पात्र राहील.
6. अर्जदाराचे बँक खाते **आधार क्रमांकाशी संलग्न (Aadhaar Linked)** असणे आवश्यक आहे.
7. ऑनलाईन अर्ज भरतांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी आल्यास केवळ वनार्टी Call Centre वर पुढील क्रमांकावर संपर्क करावा.

   **संपर्क क्रमांक** :- +91 788 788 2026

**स्वा**
**(प्रशांत वावगे)**
व्यवस्थापकीय संचालक
वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था,
(वनार्टी) महाराष्ट्र राज्य, नागपूर